**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २१ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. **देशाच्या लोकशाहीला बळकट करण्यासाठी उपयुक्त चर्चा संसदेच्या अधिवेशनात होईल, अशी आशा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून व्यक्त.**
2. **मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमांतर्गत फेलोंना मिळणार आयआयटी बॉम्बेचे मार्गदर्शन.**
3. **नागपूर महा मेट्रोने तीन नव्या स्थानकांवर शेअर ऑटो रिक्षा सेवा केली सुरु.**
4. **चंद्रपूर जिल्ह्यात आज मुसळधार पावसाची शक्यता, पूर्व विदर्भच्या अन्य जिल्ह्यात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट.**

---------------------------------------------------

**पावसाळी अधिवेशन/पंतप्रधान नरेंद्र मोदी**

**संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली. २१ ऑगस्टपर्यंत हे अधिवेशन चालणार आहे. देशाच्या लोकशाहीला बळकट करण्यासाठी उपयोगी पडेल अशी चर्चा या अधिवेशनात होईल, अशी आशा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. पावसाळी अधिवेशन सुरू होण्याआधी संसद भवन परिसरात ते आज वार्ताहरांशी बोलत होते. हे अधिवेशन देशासाठी अभिमानाचा क्षण असून आपल्या सामूहिक यशाचा विजयोत्सव आहे, असं पंत प्रधान म्हणाले. सर्व जग भारताच्या लष्करी सामर्थ्याचं साक्षीदार बनलं असून हे पावसाळी अधिवेशन विजयोत्सव आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्याच्या सूत्रधारांची घरं ऑपरेशन सिंदूरमधे २२ मिनिटात जमीनदोस्त करण्यात आली, ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय लष्कराने आपलं उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण केलं असं पंतप्रधान म्हणाले. या विजयी अधिवेशनात सर्व सभागृह एका सुरात बोलेल तेव्हा लष्कराचं मनोधैर्य वाढेल, नागरिकांना प्रेरणा मिळेल आणि संरक्षण संशोधन, नवोन्मेष आणि उत्पादन क्षेत्राला चालना मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भारतीय अर्थव्यवस्था वेगाने वाढत असून, तिसऱ्या क्रमांकाकडे झेप घेत आहे, असं पंतप्रधान म्हणाले.**

***(होल्ड बाईट-पंतप्रधान नरेंद्र मोदी)***

***जब 2014 में आप सबने हमें जिम्मेवारी दी देश फ्रेजाइल फाइव की अवस्था से गुजर रहा था। 2014 के पहले वैश्विक अर्थव्यवस्था में हम दसवें नंबर पर थे और***

*आज भारत तेज गति से दुनिया की तीसरे नंबर की अर्थव्यवस्था बनने की दिशा में आगे बढ़ रहा है, दरवाजे पर दस्तक दे रहा है।*

देशातला नक्षलवाद मुळापासून उखडून टाकण्याच्या दिशेनं संरक्षण दलाची वाटचाल सुरू आहे. शेकडो नक्षलग्रस्त जिल्हे आता स्वतंत्र झाले आहेत, असं पंतप्रधानानी सांगितलं. अधिवेशनाचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सर्व पक्षांच्या खासदारांनी सहकार्य करावं अशी विनंती प्रधानमंत्र्यांनी यावेळी केली. सर्वांनी देशहितासाठी एकत्र काम करावं, असं आवाहन त्यांनी केलं.

---------------------------------------------------

पावसाळी अधिवेशन प्रश्नोत्तरांचा तास

लोकसभेत प्रश्नोत्तरांचा तास सुरू झाल्यानंतर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यासह विविध मुद्द्यांवरून सरकारला घेरत घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे सभागृहाचं कामकाज आधी दुपारी बारा आणि नंतर दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. चर्चेचा अजेंडा ठरवण्यासाठी सल्लागार समितीची बैठक दुपारी अडीच वाजता होणार आहे, असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं. सरकार सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी तयार आहे, मात्र विरोधी पक्षाचे सदस्य हौद्यात उतरून निदर्शनं करत आहेत, हे चूक आहे, असं रिजिजू म्हणाले. लोकसभेचं आजचं कामकाज सुरू झाल्यानंतर आठ दिवंगत सदस्यांना आदरांजली वाहण्यात आली. तसंच पहलगाम दहशतवादी हल्ला आणि अहमदाबाद विमान अपघातात मरण पावलेल्यांनाही आदरांजली वाहण्यात आली. विविध राज्यात नैसर्गिक आपत्तीत जीव गमावलेल्या आणि आर्थिक हानी झालेल्यांप्रती सभागृहाने सहवेदना व्यक्त केली. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरल्या यशस्वी प्रवासासाठी लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी कॅप्टन शुभांशु शुक्ला यांचं अभिनंदन केलं.

---------------------------------------------------

राज्यसभा

एका सशक्त लोकशाहीत द्वेषाला काही जागा नसून देशात कोणताही पक्ष देशहिताला विरोध करत नाही असं राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड राज्यसभेत म्हणाले. राजकीय पक्षांच्या सदस्यांनी एकमेकांशी सौहार्द आणि आदराने वागावं, आणि अशोभनीय भाषेचा वापर टाळावा असं आवाहन त्यांनी केलं. त्याआधी राज्यसभेत निवडून आलेल्या दोन आणि राष्ट्रपती नियुक्त तीन सदस्यांना राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी शपथ दिली. तसंच राज्यसभेच्या सात दिवंगत सदस्यांना आदरांजली वाहण्यात आली. प्रश्नोत्तरांचा तास सुरू झाल्यानंतर

विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी सुरू केल्यामुळे सभागृहाचं कामकाज दुपारी बारा वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

---

**नवीन सदस्यांना शपथ**

राज्यसभेत आज नवीन सदस्यांना शपथ देण्यात आली. समाजसेवक सी. सदानंदन मास्टर, माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला, इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. मीनाक्षी जैन यांचा यात समावेश आहे. विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी नियम २६७ अंतर्गत पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा मुद्दा उपस्थित केला. हे दहशतवादी अद्याप पकडले गेले नाहीत, हे देशाच्या सुरक्षा यंत्रणेचं अपयश असल्याचं ते म्हणाले. दहशतवादाविरोधात आणि ऑपरेशन सिंदूरला काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांनी सरकारला पाठिंबा दिला, त्यामुळे याबद्दल सरकारने सविस्तर माहिती द्यावी, असं खरगे म्हणाले. सरकार पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरबद्दल चर्चा करण्यास आणि देशाला माहिती देण्यास तयार आहे, असं सभागृह नेते जे पी नड्डा यांनी सांगितलं. मात्र तरीही विरोधकांचं समाधान न झाल्यानं त्यांनी गदारोळ करण्यास सुरुवात केली. त्यामुळे राज्यसभेचं कामकाजही १२ वाजेपर्यंत स्थगित झालं होतं.

---

**फेलोशिप कार्यक्रम**

मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमात सहभागी युवकांना सार्वजनिक धोरण (पब्लिक पॉलिसी) प्रमाणपत्र अभ्यासक्रम देण्यासंदर्भात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्य शासनाच्या नियोजन विभागाने भारतीय प्रौद्योगिक संस्था IIT,पवई, मुंबई सोबत सामंजस्य करार केला. 'आयआयटी' बरोबरच्या या अभ्यासक्रमामुळे फेलोशिप कार्यक्रमातील तरुणांच्या क्षमतांमध्ये वाढ होणार असून त्यांना अधिक प्रभावीपणे काम करता येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या वर्षीपासून जिल्हास्तरावर फेलोशिप कार्यक्रम राबविण्यात येत असून जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याबरोबर क्षेत्रीय स्तरावर काम करण्याची संधी त्यांना मिळणार आहे.तसेच त्यांच्या ज्ञानाचा फायदा शासनालाही धोरणात्मक निर्णय घेताना होणार आहे. सार्वजनिक विकासाचे प्रश्न समजण्यासाठी व ते सोडविण्यासाठी आवश्यक साधने आणि शास्त्र यांचे ज्ञान देण्याचा प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा उद्देश आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

---

**नागपूर मेट्रो**

**नागपूर मेट्रो प्रवाशांसाठी फर्स्ट आणि लास्ट माईल कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत असून महा मेट्रोने आज 'शेअर ऑटोरिक्षा सेवा'चा विस्तार इंदोरा चौक, गड्डीगोदाम चौक आणि झिरो माईल फ्रीडम पार्क या महत्त्वाच्या स्टेशन पासून सुरु केला आहे. या नव्या सेवेसह, सध्या नागपूर मेट्रोच्या २४ स्थानकांवर शेअर ऑटो रिक्षा सेवा उपलब्ध आहेत. शेअर रिक्षा उपलब्ध असलेल्या स्थानकांवर सेवा सुरू झाल्यानंतर पहिल्याच काही महिन्यांत दररोजच्या प्रवाशांमध्ये ८-१०% इतकी वाढ नोंदविण्यात आली आहे. प्रवाशांच्या अभिप्रायावरून महा मेट्रोने पिकअप पॉइंट्समध्ये बदल केले, मार्गांची पुनर्रचना केली आणि वेळापत्रकांमध्ये सुधारणा केली. परिणामी, प्रतिक्षा वेळ कमी झाली असून ही सेवा आजूबाजूच्या निवासी आणि व्यापारी भागांपर्यंत विस्तारित झाली आहे.**

---------------------------------------------------

**दीक्षाभूमी**

**दीक्षाभूमीच्या विकास कामांसाठी राज्य शासनाकडून** 200 **कोटी रुपये मंजूर झाले. मात्र अद्यापही कामाला सुरुवात झाली नाही. तांत्रिक कारणामुळे आठ महिन्यांपासून काम बंद आहे. धम्मचक्र प्रवर्तनदिन सोहळ्याला केवळ अडीच महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे. त्यामुळे दीक्षाभूमीवरील विकासकामे तत्काळ पूर्ण करावीत, अशी अपेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केली. यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून दीक्षाभूमीच्या विकासकामांकडे लक्ष वेधले आहे.**

---------------------------------------------------

**उर्स**

**सूफी संत हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांच्या १०३ व्या वार्षिक उर्सच्या २६ व्या शरीफ निमित्त, उद्या मंगळवार दिनांक २२ जुलै रोजी शाही दरबारी संदल काढण्यात येईल. शाही दरबारी संदल हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट कार्यालयातून सकाळी १० वाजता निघेल. शहरातील विविध मार्गांनी सायंकाळी ताजबाग इथं हि संदल पोहोचेल. तसेच २६ तारखेला दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टने सर्व भाविकांना यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. बाबा ताजुद्दीन यांचा वार्षिक उर्स २९ जुलैपर्यंत सुरू राहील.**

---------------------------------------------------

**प्लॅटफॉर्म तिकिट**

**दरम्यान या उर्स निमित्त रेल्वे स्थानकांमध्ये संभाव्य गर्दीच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची सुरक्षित आणि सुरळीत हालचाल सुनिश्चित करण्यासाठी मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने नागपूर आणि अजनी रेल्वे स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी लागू केली आहे. या कार्यक्रमा दरम्यान होणारी गर्दी नियंत्रित करण्यासाठी ही बंदी उद्या २२ जुलै २०२५ ते शुक्रवार, २५जुलै २०२५ या कालावधीसाठी असेल.**

---

**एकनाथ शिंदे**

**राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उद्या** 22 **जुलै रोजी वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. मोतीबिंदू मुक्त वर्धा जिल्हा अभियानाच्या उद्घाटन कार्यक्रमास ते उपस्थित राहणार आहे.**

---

**हवामान**

**येत्या काही तासात चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह हलक्या पावसाची शक्यता असून अमरावती, नागपूर, वर्धा, यवतमाळ, गोंदिया, भंडारा जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता नागपूरच्या हवामान विभागाने वर्तवली आहे.दरम्यान विदर्भात आज चंद्रपूर जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता असून वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यात वादळी पर्जन्यमान राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. उद्या देखील नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि अमरावती या ठिकाणी वादळी पर्जन्यमानाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. या दरम्यान गडचिरोली इथं मुसळधार पाऊस पडू शकतो.**

---